अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजनेची अंमलबजावणी करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्र.बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/मावक-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०९ मार्च, २०१०

वाचा :- १) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.बीसीएच-२००८/प्र.क्र.३६/मावक-२, दिनांक १५ नोव्हेंबर,२००८

२) शासन निर्णय,गृह निर्माण विभाग, क्र.रांगायो-९९/प्र.क्र.१८०/गनियो-१, दि.२१.०८.२००९.

३) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्र.इआये-२००९/प्र.क्र.१५३/योजना-१०, दिनांक ३१.०८.२००९

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील लोकांसाठी उपरनिर्देशित संदर्भ क्र. १ अन्वये **"अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकूल योजना"** जाहीर करण्यात आली आहे.

या योजनेनुसार घरांच्या बांधकामासाठी खर्चाची कमाल मर्यादा ग्रामीण क्षेत्रासाठी रू.१.०० लाख, नगरपालिका क्षेत्रासाठी रू. १.५० लाख व महानगरपालिका क्षेत्रासाठी रू.२.०० लाख निश्चित करण्यात आली होती. परंतू गृहनिर्माण विभागाच्या धोरणानुसार ग्रामीण भागात शासकीय योजनेतून बांधावयाच्या घरांसाठी खर्चाची कमाल मर्यादा उपरनिर्देशित शासन निर्णय क्र. रांगायो-९९/प्र.क्र.१८०/गनियो-१, दि. २१.८.२००९ अन्वये रू. ७०,०००/- करण्यात आली आहे. सदरच्या धोरणानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकूल योजनेअंतर्गत ग्रामीण क्षेत्रात बांधकामासाठी खर्चाची कमाल मर्यादा रू. ७०,०००/- करणे क्रमप्राप्त ठरते. तसेच, सदरच्या घरकूल योजनेतील प्रचलित निकषानुसार गरजू लोकांकडून मोठ्या प्रमाणावर प्राप्त झालेले विनंती अर्ज विचारात घेऊन आणि योजनेअंतर्गत उपलब्ध होणारा निधी याचा विचार करून सदरच्या योजनेत आवश्यक ते बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त बाबींचा साकल्याने विचार करून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे सुधारित घरकुल योजनेस शासन मान्यता देत आहे :-

१. **योजनेचे नांव :-** **अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना.**

२. **योजनेचे स्वरुप:-** राज्यातील ग्रामपंचायत, नगरपरिषदा व महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द व्यक्तींना पक्की घरे तसेच कच्च्या घराचे पक्के बांधकाम करता येईल तसेच शासकीय अभिकरणामार्फत घर खरेदीस या शासन निर्णयाद्वारे विहित घर किंमत मर्यादेत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.



झोपडपट्टी सुधारणा विभाग
आवक क्र. - ९८०
दिनांक - ०६/०४/१०
नांव -

**३. लाभार्थ्यांस शासनाच्या एकाच योजनेचा लाभ मिळणे**

अ) **आय.एच.एस.डी.पी.** अंतर्गत गृहनिर्माण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत निवड झालेले लाभार्थी वगळून उर्वरित अनुसूचित जातीच्या अर्जदारांमधून पात्र लाभार्थ्यांची निवड करून या योजनेअंतर्गत लाभ देण्यात यावा.

ब) **इंदिरा आवास योजना** ही ग्राम विकास विभागाकडून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार ग्रामीण भागात राबविण्यात येणाऱ्या घरांमध्ये अनुसूचित जाती संवर्गासाठी आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. सदरचे आरक्षणाअन्वये लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना वगळून उर्वरित अनुसूचित जातीच्या अर्जदारांमधून पात्र लाभार्थ्यांची निवड करून या योजनेअंतर्गत लाभ देण्यात यावा.

क) **आदिवासी विभागाची घरकूल योजना**, ग्राम विकास विभागाची इंदिरा आवास योजना, गृह निर्माण विभागाची घरकूल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची घरकूल योजना यांची अंमलबजावणी शक्यतो एक गांव, एक नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रात एकाच वेळी संबंधीत यंत्रणेने/संस्थेने करावी.

**कोणत्याही परिस्थितीत घरकूल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांस एकाच योजनेचा लाभ देण्यात यावा.**

**४. अ) लाभार्थ्यांची पात्रता:-**

१) लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती वा नवबौध्द संवर्गातील असावा.

२) लाभार्थ्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षाचे असावे.

३) अर्जदाराच्या कुंटुबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा खालीलप्रमाणे राहिल :-

| | |
|---|---|
| अ) ग्रामीण क्षेत्र | : रु. १.०० लाख |
| ब) नगरपरिषद क्षेत्र | : रु. १.५० लाख |
| क) महानगरपालिका क्षेत्र | : रु. २.०० लाख |
| ड) मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र | : रु. २.०० लाख |

४) शासनाच्या धोरणानुसार दि.१.१.१९९५ या दिनांकास राज्य शासन/ महानगरपालिका / नगरपालिका / स्थानिक स्वराज्य संस्था / एम.एम.आर.डी.ए. / शासनाचे उपक्रम यांच्या जमीनीवर अतिक्रमण करून रहात असलेले व दि.१.१.१९९५ रोजी त्यांचे घरकूल/निवासस्थान उपरोक्त जमीनीवर असल्यास आणि त्यांना संरक्षित झोपडीदार म्हणून संरक्षण प्राप्त असल्यास अशा लाभार्थींना देखील या योजनेत समाविष्ट केले जाईल. भविष्य काळात झोपडपट्टीवासीयांचे पात्रता निकषात बदल झाल्यास त्याबाबत लाभार्थींची पात्रता निश्चित करून घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा.

५) लाभार्थीने शासनाच्या अन्य गृहनिर्माण योजना जसे - म्हाडामार्फत वितरीत घरे, एस.आर.ए. अंतर्गत बांधलेली घरे, मा.मुख्यमंत्री महोदय स्वेच्छा निर्णयानुसार वितरीत झालेल्या सदनिका, वाल्मिकी आंबेडकर आवास योजना लोक आवास इत्यादी योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

६) नागरी कमाल जमीन धारणा अधिनियमांतर्गत शासनास प्राप्त होणाऱ्या ५% सदनिकांमधून कोणत्याही नागरी समुहात सदनिका वितरीत झाल्यास व असा लाभार्थी या योजनेअंतर्गत पात्रतेच्या अन्य अटी पूर्ण करीत असल्यास त्यास या योजनेअंतर्गत अनुदानासाठी पात्र ठरविण्यात येईल.

**ब) लाभार्थीने सादर करावयाची कागदपत्रे :-**

१) ७/१२ चा उतारा, मालमत्ता नोंदपत्र (प्रॉपर्टी रजिस्टर्ड कार्ड) ग्रामपंचायतीतील मालमत्ता नोंदवहीतील उतारा यापैकी एक.

२) घरपट्टी, पाणीपट्टी, विद्युत बील या कागदपत्रांपैकी एक.

३) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

४) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला

५) अतिरिक्त दाखले : खाली नमूद केलेली कागदपत्रे/दाखले पुरावे म्हणून ग्राह्य धरण्यात येतील :-

अ) दिनांक १.१.१९९५ च्या किंवा मतदार यादीतील नांवाचा उतारा

ब) निवडणूक मतदार ओळखपत्र

क) रेशनकार्ड

ड) सरपंच/तलाठ्याचा दाखला

इ) महानगरपालिका/नगरपालिकेतील मालमत्ता कर भरल्याच्या पावतीची प्रत.

**५. घराची किंमत मर्यादा:-** घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कमाल खर्चाची मर्यादा पुढीलप्रमाणे आहे.

अ) ग्रामीण क्षेत्र : रु. ७०,०००/-

ब) नगरपालिका क्षेत्र : रु. १,५०,०००/-

क) महानगरपालिका क्षेत्र : रु. २,००,०००/-

ड) मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्र : रू. २,००,०००/-

**६. घराचे क्षेत्रफळ:-** घराच्या बांधकामाचे चटई क्षेत्र २६९ चौ.फूट राहील. तेवढ्याच क्षेत्रासाठी शासकीय अनुदान अनुज्ञेय राहिल. तथापि, लाभार्थी स्वतःच्या मालकीची जागा असेल तर त्यावर त्याच्या मर्जीनुसार अनुदान वापरुन त्यावरील होणार खर्च स्वखर्चाने जास्त क्षेत्राचे बांधकाम करु शकेल.

**राज्यातील काही शहरामध्ये २.५ पर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I.) अनुज्ञेय आहे,या तरतुदीचा फायदा घेण्यासाठी निवड झालेले लाभार्थी एकत्र येऊन त्यांना त्यानुसार बहुमजली इमारतीचे बांधकाम करता येईल.**

**७. घराचा आराखडा :-** सोबत जोडलेल्या घराच्या आरखडयाप्रमाणे / नकाशाप्रमाणे बांधकाम करण्यात यावे. तथापि, जागेच्या उपलब्धतेनुसार आवश्यक तेथे आराखड्यामध्ये बदल करण्यात येईल. मात्र लाभार्थी अनुदानाचा वापर करुन अतिरिक्त लागणारी रक्कमेत बांधकाम करत असेल तर अशा लाभार्थ्यास या अटीतून वगळण्यात यावे.

**८. बांधण्यात यावयाच्या घरांचे उद्दीष्ट :-**

| | | |
|---|---|---|
| अ) ग्रामीण क्षेत्र | : | ६८,५०० |
| ब) नगरपालिका क्षेत्र | : | १५,००० |
| क) महानगरपालिका क्षेत्र | : | ५,००० |
| ड) मुंबई महानगर प्रदेश | : | ५,००० |
| | | ९३,५०० |

**९. प्राधान्य क्षेत्र:-** घरे बाधतांना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम देण्यात येईल :-

अ) जातीय दंगलीमध्ये घराचे नुकसान (आगीमुळे व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती.

ब) ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार पिडित झालेल्या अनुसूचित जातीच्या पात्र व्यक्ती.

क) पूरग्रस्त क्षेत्र

ड) घरात कोणीही कमवत नाही अशा विधवा महिला.

इ) शासकीय अभिकरणामधून निवड झालेल्या व्यक्तींना परिच्छेद अनुक्रमांक २ नुसार अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

ई) उर्वरित सर्व क्षेत्र.

**१०. लाभार्थी हिस्सा:-** घराच्या बांधकामाच्या खर्चामध्ये लाभार्थीचा हिस्सा खालीलप्रमाणे असेल :-

अ) ग्रामीण क्षेत्र : निरंक

ब) नगरपालिका क्षेत्र : ७.५ टक्के

क) महानगरपालिका क्षेत्र : १० टक्के

१. नगर पालिका व महानगर पालिका क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबाला लाभार्थी हिस्सा भरण्याची आवश्यकता नाही.

२. लाभार्थी हिस्सा, संबंधीत विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी लाभार्थी निवडीनंतर लाभार्थीकडून लाभार्थी हिस्स्याची रक्कम घेऊन विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी व लाभार्थी यांच्या संयुक्त नांवे राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून त्यात जमा करावा. राष्ट्रीयकृत बँकेने कामाचा प्रगती अहवाल विचारात घेऊन मागणीप्रमाणे रक्कम वितरीत करावी.

३. वरील मुद्दा क्र.२ प्रमाणे कोणत्याही परिस्थितीत लाभार्थ्याने हिस्सा भरल्याशिवाय बांधकाम सुरु करण्यात येऊ नये. मात्र लाभार्थी स्वत: घरबांधणी करीत असेल तर, त्यांनी केलेले श्रमदान ही मजूरी समजून त्यांच्याकडून हिस्सा घेण्यातून सूट देण्यात येत आहे.

**११.सर्वेक्षण करणे :-** सर्वेक्षण करणे, योजनेचे मार्गदर्शन करणे इत्यादी बाबींसाठी प्रशासकीय खर्च म्हणून ५ टक्के रक्कम घरकुल योजनेसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीमधून राखून ठेवण्यात यावी व त्यातून निवड झालेल्या लाभार्थ्यांचे प्रकरण तयार करणे, जुन्या कच्च्या घराचे व जागेचे मोजमाप करणे, नवीन घराचा आराखडा तयार करणे, इत्यादी कामासाठी वापरावा. हे काम तलाठी/सेवाभावी संस्थेस सोपवून त्यांच्याकडून करून घ्यावे.

**१२. दलित वस्ती योजनेअंतर्गत पुरवावयाच्या पायाभूत सुविधा** ग्रामीण व नागरी भागात दलित वस्ती योजनेअंतर्गत पायाभूत सुविधा जसे, रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, वीज, पाणी व गटारे इ. बाबींचा अंतर्भाव आहे.

सदर दलित वस्ती योजना राबविण्यासाठी अनुसूचित जाती उप योजनाअंतर्गत दरवर्षी निधी उपलब्ध करून दिला जातो. सदर दलित वस्ती योजना ग्रामीण भागात जिल्हा परिषदेमार्फत व शहरी भागात सबंधीत नगरपालिका/महानगरपालिकेमार्फत राबविली जाते. ज्या ठिकाणी ग्रामीण/नागरी भागात १० पेक्षा जास्त घरे एकाच भागात घरकुल योजनेअंतर्गत घरे बांधली जातील अशा ठिकाणी संबंधीत जिल्हा परिषद/नगरपालिका/महानगरपालिका यांनी दलित वस्ती उप योजनेअंतर्गत येणारा निधी उक्त ठिकाणी पायाभूत सुविधा/परिसर सुधारणेसाठी उपलब्ध करून द्यावा. सदरचा निधी संबंधीतांकडून उपलब्ध होतो किंवा नाही याची पाहणी करण्यासाठी गृहनिर्माण समितीस प्राधिकृत करण्यात येत आहे.

**१३. केंद्रस्थ अधिकारी :-** **सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना आपले दैनंदिन काम सांभाळून योजना राबविण्यासाठी "केंद्रस्थ अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, केंद्रस्थ अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे काम विभागीय समाज कल्याण अधिकारी यांना "पर्यवेक्षकीय केंद्रस्थ अधिकारी " म्हणून घोषित करण्यात येत आहे.**

**१४. घरकुल निर्माण समिती :-** ग्रामीण, नगरपरिषद, आणि महानगर पालिका क्षेत्रात घरकुल योजना राबविण्यात यावयाची असल्यामुळे खालीलप्रमाणे घरकुल निर्माण समिती नियुक्त करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | क्षेत्र | घरकुल निर्माण समिती | पद |
|---|---|---|---|
| अ) | ग्रामीण | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद | अध्यक्ष |
| | | प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए. | सदस्य |
| | | कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषद (सा.बां.वि.) | सदस्य |
| | | प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास | सदस्य |
| | | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य सचिव |

| | | |
|---|---|---|
| ब) नगरपरिषद | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| | अतिरिक्त जिल्हाधिकारी | सदस्य |
| | तहसिलदार वर्ग -१ | सदस्य |
| | संबंधीत रचनाकार | सदस्य |
| | मुख्य अधिकारी, नगरपरिषद | सदस्य |
| | प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास | सदस्य |
| | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य सचिव |
| क) महानगरपालिका | आयुक्त महानगरपालिका/मुख्य अभियंता,मनपा | अध्यक्ष |
| | उपसंचालक - नगर रचना | सदस्य |
| | विभागीय समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| | प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य सचिव |

**१५. घरकुल निर्माण समितीचे अधिकार :-**

१) समिती दर महिन्याला किमान एकदा घरकुल योजनेचा आढावा घेऊन योजनेची अंमलबजावणी सुलभ रितीने होण्याच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शन करील.

२) सदस्य सचिवांकडून घरकुल योजनेच्या अनुषंगाने सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावावर/अहवालांवर निर्णय घेईल व त्या अनुषंगाने निकषानुसार लाभार्थ्यांची निवड करील.

३) लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर दयावयाचे अनुदान घरकुल निर्माण समितीचे अध्यक्ष आणि सदस्य सचिव यांच्या मान्यतेने व स्वाक्षरीने वितरीत करण्यात येईल.

४) घरकुल निर्माण समिती महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पुर्नवीकास अधिनियम, १९७१ मधील कलम ३ झेड - ७ व ३ व ४) मधील तरतूदीचा वापर करुन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सहमतीने वेळोवेळी योग्य तो निर्णय घेईल.

**१६. समन्वय :-**

घरकुल निर्माण समितीकडून अमलबजावणी करण्यात येत असलेल्या योजनांचा राज्यस्तरावर आढावा घेण्यासाठी खालीलप्रमाणे "घरकुल योजना समन्वय समिती" नियुक्त करण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| सचिव (सामाजिक न्याय) | अध्यक्ष |
| सचिव (नगर विकास) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| सचिव (गृह निर्माण)अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| सचिव (ग्राम विकास) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| संचालक, समाजकल्याण | सदस्य सचिव |

वरील समिती दर दोन महिन्यांनी आढावा घेऊन मा. मंत्री, समाजिक न्याय यांना अहवाल सादर करील.

**१७. जमिनीची उपलब्धता व योजनेची अंमलबजावणी :-**

१) लाभार्थ्यांनी स्वत: व सोबतच्या लाभार्थ्यांना मदत करून निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या सहकारी गृहनिर्माण प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच, असे लाभार्थी एकत्र येऊन बहुमजली इमारत बांधण्यास इच्छूक असतील अशांना प्राधान्य देण्यात येईल. अनुदानापेक्षा जास्त खर्च येत असल्यास लाभार्थ्यांनी स्वत: तो खर्च उपलब्ध करून द्यावयाचा आहे.

२) जे लाभार्थी त्यांचे घरकुल महानगरपालिका, नगरपालिका, अन्य स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत बांधण्यास तयार असतील त्यांना परवानगी देण्यात येईल.

३) लाभार्थीनी सामुहीकरित्या स्वयंसेवी संस्थांमार्फत घरकुलाचे बांधकाम केल्यास त्यास परवानगी देण्यात येईल.

४) मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रात मुंबई महानगर विकास प्राधिकरणाद्वारे बांधलेल्या किंवा प्राधिकरणास उपलब्ध झालेल्या सदनिका घरकुल योजनेअंतर्गत पात्र लाभार्थींना मंजूर करण्यात येतील.

५) नगरपालिका, महानगरपालिका अथवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मालकीच्या अतिक्रमित किंवा मोकळ्या भुखंडांवर लाभार्थींनी गृहनिर्माण योजना राबविल्यास व त्यास महानगरपालिका/नगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था यांची ना-हरकत असल्यास अशी योजना कार्यान्वित करण्यात येईल.

६) ज्या लाभार्थीकडे स्वत:च्या मालकीची जमीन/भूखंड आहे अशा लाभार्थींना प्रथम प्राधान्य देण्यात येईल, परंतू असे करताना सामुहिक गृहनिर्माण प्रकल्पांस सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल व त्यानंतर वैयक्तिकरित्या घरकुल बांधण्यास मान्यता दिली जाईल.

७) ग्रामीण भागात ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषद यांनी या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थींना भुखंड/जमीन विनामुल्य उपलब्ध करून दिल्यास योजना कार्यान्वित करण्यात येईल.

८) म्हाडा/सिडको/एम.एम.आर.डी.ए. या संस्थांकडे निवासी प्रयोजनार्थ जमीन/भुखंड राखीव असल्यास व त्यांनी या योजनेअंतर्गत असे भूखंड नाममात्र दराने लाभार्थींना/ लाभार्थींच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना उपलब्ध करून दिल्यास त्याठिकाणी योजना राबविण्यात येईल.

**१८. लॉटरी पध्दतीने लाभार्थ्यांची निवड करणे :-**

जिल्हयात असलेली गांवे, नगरपरिषदा आणि महानगरपालिका यांच्यातून लॉटरी पध्दतीने गावे, नगरपरिषदा आणि महानगरपालिका यांची निवड करण्यात येईल. ही लॉटरी विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेस्तरावर संगणकीय पध्दतीने काढली जाईल. त्यानुसार पात्र लाभार्थींची यादी तयार करून ती ठळक पध्दतीने प्रसिध्द करण्यात येईल. अशी निवड झाल्यानंतर निश्चित करण्यात आलेल्या उद्दिष्टा अंतर्गत घरे बांधण्यास परवानगी देण्यात येईल. इंदिरा आवास योजना, आय.एच.एस.डी.पी. आणि अनुसूचित जमातीसाठी घरकूल योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या ठिकाणावरील वर मुद्दा क्र. ३ मध्ये नमूद केलेले लाभार्थी वगळता उर्वरित लाभार्थ्यांसाठी त्याच गांवी/नगरपरिषद आणि महानगरपालिका येथे योजना राबवावी. तसेच लाभार्थ्यांची निवड करतांना मुद्दा क्र.९ मधील व्यक्तींना प्राधान्य देण्यात यावे. तसेच खालील अटी बंधनकारक राहिल :-

अ) ज्या व्यक्तींकडे स्वत:ची जमीन / भुखंड आहे. अशा व्यक्तींना प्रथम टप्यात लाभ देण्यात यावा. लाभ देतांना परिच्छेद ९ प्रमाणे प्राधान्य क्षेत्रातील व्यक्तींचा प्रथम विचार करण्यात यावा.

ब) ज्या व्यक्तींकडे स्वत:ची जमीन / भुखंड नाही अशा ग्रामीण भागातील व्यंक्तींसाठी ग्रामपंचायत यांनी जमीन उपलब्ध करुन दयावी अशी जमिन उपलब्ध झाल्यानंतर घर बांधण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

क) नगरपरिषद/महानगर पालिका क्षेत्रातील आरक्षीत जागेवर वसलेल्या झोपडपट्टयामधील व्यक्तींची नावे दि.१.१.१९९५च्या मतदार यादीत आहेत. अशा व्यक्ती संरक्षण पात्र समजून आहे त्याच जागेवर घर बांधण्यास मंजूरी

देण्यात यावी. तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ मधील कलम ३ झेड ५ नुसार कार्यवही करण्यात यावी.

ड) सक्षम प्राधिकाऱ्याकडून घोषित करण्यात आलेल्या झोपडपट्टीमधील संरक्षण पात्र व्यक्तींना घरे बांधण्यास परवानगी, देण्यात यावी.

**१९.अनुदान वितरण कार्यपध्दती :-**

गृह निर्माण समिती अध्यक्ष आणि सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने खालीलप्रमाणे अनुदान विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी व लाभार्थ्याच्या नांवे सुरु करण्यात आलेल्या बँकेच्या खात्यात जमा करण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| अ) घराचे बांधकाम सुरु करताना | - | ५० टक्के |
| ब) ५० टक्के निधीचे उपयोगित प्रमाणपत्र सादर केल्यानंतर | - | ४० टक्के |
| क) घराचा ताबा घेताना आणि सक्षम प्राधिकाऱ्यांनी पूर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर | - | १० टक्के |

**२०. योजनेवरील नियंत्रण :-**

अ) संचालक, समाजकल्याण यांनी आपल्या मासिक बैठकीत आढावा घ्यावा आणि योजनेच्या क्षेत्रीय स्तरांवरील अडचणी/उणीवा दूर करण्यासाठी कार्यवाही करावी.

ब) शासनस्तरावरील नियुक्त करण्यात आलेल्या सचिव समितीने दर तीन महिन्यांनी आढावा घ्यावा.

क) विभागीय आयुक्त यांनी योजनेची अमलबजावणी योग्य रितीने होते किंवा कसे याबाबत त्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीत घरकुल विषय समाविष्ट करुन आढावा घ्यावा.

ड) योजनेची यशस्वीरित्या अंमलबजावणी होते किंवा नाही यासाठी पर्यवेक्षक म्हणून काही कर्मचारीवृंद करार पध्दतीने नियुक्त करणे आवश्यक आहे. कर्मचारीवृंद नियुक्त करण्याचे अधिकार संचालक, समाज कल्याण यांना देण्यात येत आहे.

**२१.बांधकाम यंत्रणा:-**

अ) लाभार्थ्यानी स्वत:च बांधकाम केल्यास त्याला प्राधान्य देण्यात यावे.

ब) लाभार्थी स्वत: बांधकाम करीत नसेल तर, खाजगी विकासकामार्फत त्यांच्या सहमतीने वैयक्तीकरित्या बांधून देता येईल.

क) एकाच ठिकाणी एका पेक्षा जास्त निवड झालेले लाभार्थी असतील तर, निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या सहमतीने बाधकाम एजन्सी नेमणूक करुन बांधकाम करुन घ्यावे.

ड) नगरपरिषद / महानगरपालिका क्षेत्रासाठी लाभार्थी स्वत: बांधकाम करु शकत नसेल तर, नामांकित बांधकाम व्यवसायिकांची यादी जाहीरात देऊन, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकषाप्रमाणे जिल्हावार तयार करुन शासनाच्या मान्यतेनंतर निवड झालेल्या एजन्सींना कामे देण्यात यावीत.

इ) म्हाडाच्या मालकीच्या जमिनीवर म्हाडाकडून बांधकाम केले जाणार आहे, अशा बांधकाम झालेल्या सदनिका अनुदान किमतीत घेण्यात याव्यात व लाभार्थ्यांना गृह निर्माण समितीच्या सल्याने वाटप करण्यात याव्यात.

ई) नगरपरिषद क्षेत्रात मुख्याधिकारी यांनी आपल्या यंत्रणेमार्फत बेघरांसाठी घर या सदराखाली आरक्षीत जमिनीत बांधकाम करुन गृह निर्माण समितीच्या सल्याने लाभार्थ्यांना वाटप करण्यात यावे. यासाठी येणारा खर्च अनुदानाच्या मर्यादेत उपलब्ध करुन देण्यात येईल.

उ) महानगरपालिका क्षेत्रात आयुक्त, महानगरपालिका उक्त योजना राबविण्यास सक्षम असून, त्यांनी आपल्या यंत्रणेमार्फत योजना राबविण्यास देय अनुदान देण्यात येईल. महानगरपालिकाकडून बांधल्या जाणाऱ्या सदनिका गृह निर्माण समितीच्या सल्याने वाटप करण्यात यावे.

ऊ) महानगर क्षेत्रात मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत घरे बांधून देण्यात यावी व सदरची घरे गृह निर्माण समितीच्या सल्याने वाटप करण्यात याव्यात.

ए) ग्रामीण भागात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत देय अनुदानातून घरे बांधून देण्यात येऊन गृह निर्माण समितीच्या सल्याने वाटप करण्यात याव्यात.

ऐ) घरकूल योजनेसाठी लागणारे बांधकाम साहित्य शक्यतो जिल्हा गृहनिर्माण केंद्रांकडून विकत घ्यावे.

**२२. आहरण व संवितरण अधिकारी :-**

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील तसेच नियंत्रक अधिकारी म्हणून संचालक, समाज कल्याण, पुणे हे राहतील.

**२३. कार्यालयीन/ लाभार्थ्याने करावयाची कार्यवाही :-**

अ) लाभार्थ्यांचा अर्ज मंजूर झाल्यानंतर अस्तित्वातील घर तोडून नविन घराचे बांधकाम करण्यापूर्वी घराची पाहणी करुन कच्च्या घराचा लाभार्थ्याच्या कुटूंबासोबत फोटो घेण्यात यावा. सदर कार्यवाही समाज कल्याण संचालनालयातील अधिकारी / कर्मचाऱ्याने (वर्ग-३ पेक्षा कमी दर्जाच्या नसावा) करावी.

ब) घरपूर्ण झाल्यानंतर त्या घरावर सामाजिक न्याय विभागाच्या अर्थ सहाय्यातून घर बांधण्यात आले, असे स्पष्ट नांव व वर्ष असलेली कोरीव कोनशीला तयार करुन बसवावी. बिल्डींग / फ्लॅटमध्येही प्रवेशव्दारावर सामाजिक न्याय विभागाच्या अर्थ सहाय्यातून घर बांधण्यात आले, असा नामफलक लावण्यात यावा.

क) घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्याच्या कुटूंबासोबत घराचा फोटो घेण्यात यावा.

ड) वरील अ, ब व क साठी येणारा खर्च घराच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

इ) कच्च्या घराचे बांधकाम पाडून पक्के घराचे बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या कालावधीमध्ये लाभार्थ्यांनी स्वत: राहण्याची व्यवस्था करावी.

फ) नवीन घर लाभार्थी पती-पत्नी यांच्या संयुक्त नांवाने देण्यात यावे.

**२४. बांधकामाची तपासणी :-**

लाभार्थी निवडल्यानंतर बांधकाम सुरु झाल्यानंतर बांधकाम व्यवस्थीत सुरु आहे काय, लाभार्थ्यांचे घराचे बांधकाम सुरु आहे याकडे लक्ष आहे काय, बांधकामाचा दर्जा चांगला आहे काय या बाबींची तपासणी करण्यासाठी संचालक, समाज कल्याण, पुणे यांनी जिल्हा निहाय पथक तयार करावे. एका जिल्हयातील पथकाकडून दुसऱ्या जिल्हयातील बांधकामांची पाहणी करण्यात यावी. संचालकस्तरावर काही प्रकरणी बांधकामाची तपासणी करावी.

**२५. प्रबोधन करणे :-**

ग्रामीण/नगरपरिषद/महानगरपालिका क्षेत्रामध्ये लाभार्थ्यांना योजनेची माहिती देणे या व इतर बाबींचे प्रबोधन करण्यास, मेळावे, भिंतीपत्रके व वृत्तपत्रामध्ये सविस्तर बातमी देण्यास जिल्हा माहिती केंद्रास प्राधिकृत करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय गृह निर्माण, नगर विकास विभाग, ग्राम विकास व महसुल विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.


हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००३०९१५१८१७००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

( सतीश म.गवई )
प्रधान सचिव
महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक
अप्पर मुख्य सचिव, नगरविकास विभाग यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव (ग्रामविकास), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रविकास प्राधिकरण,बांद्रा कुर्ला संकुल,मुंबई.
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,वांद्रे (पू.) मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व महानगरपालिका आयुक्त
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व मुख्याधिकारी नगरपालिका /नगरपरिषद
सर्व प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग
संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व समाजकल्याण अधिकारी,गट-अ, जि.प.
वित्त विभाग (व्यय-१४/अर्थोपाय,) मंत्रालय, मुंबई.
सर्व कार्यासने, सा.न्या.व वि.सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती-मावक-२.

# TYPE DESIGN OF HOUSE






एच-२६९५-५अ.